# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक ०३/१०/२०२२

## कार्यवृत्त

आज दिनांक ०३/१०/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभाग, लेखा विभाग व आरोग्य विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

विषय क्र.१:- लि. भो. चांडक विद्यालय शाळेमागील नालीचे बांधकाम करण्या बाबत

विषय क्र.२:- एकता नगर येथे श्री सुरडकर यांच्या घराजवळ नाली बांधकाम करण्या बाबत.

विषय क्र.३:- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या परिसरात मार्बल, कोटा वा शहाबाद फरशी बसविण्याबाबत

विषय क्र ४:- चाळीस बिघा भागातील पाचपांडे दवाखान्यासमोरील रस्ता दुरुस्तीकरण करणेबाबत.

विषय क्र ५:- सनदी लेखापाल यांनी सन २००९ पर्यंत तयार केलेल्या दुहेरी लेखा नोंद पद्धती अहवालावर सभेची मान्यता घेणेबाबत.

विषय क्र. ६:- मै. विशाल दिगंबर चव्हाण सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर लाड कमेटी शिफारसी वारस हक्काने नियुक्ती मिळणेबाबत.

विषय क्र. ७:- न.प. हद्दीतील शिवाजी नगर भागातील स्मशान भूमीचे दुरुस्तीकरण करणे बाबत.

विषय क्र. ८:- न.प. मलकापूर पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाचे दुरुस्तीकरण करणे बाबत.

विषय क्र. ९:- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

विषय क्र. १०:- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

विषय क्र. ११:- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

विषय क्र. १२:- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

---

विषय क्र १ : - लि. भो. चांडक विद्यालय शाळेमागील नालीचे बांधकाम करण्या बाबत



Scanned by Scanner Go

लि. भो. चांडक विद्यालय शाळेमागील नालीचे बांधकाम करण्या बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, लि. भो. चांडक विद्यालयाच्या दक्षिण बाजूस नालीचे दुरुस्ती करण करण्या करिता तोडण्यात आली असून नव्याने बांधकाम झालेले नसल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सदर केलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी शाळेचा सांडपाण्याचा प्रश्न निर्माण होऊन तेथील राहिवास्यांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे सदर नालीचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता लि.भो. विद्यालयाच्या दक्षिण बाजूस नालीचे बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र २ :- एकता नगर येथे श्री सुरडकर यांच्या घराजवळ नाली बांधकाम करण्या बाबत.**

एकता नगर येथे श्री सुरडकर यांच्या घराजवळ नाली बांधकाम करण्या बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, एकता नगर येथे श्री सुरडकर यांच्या घरापासून ते देवी मंदिरा पर्यंत नाली ची दूरावस्था असून नालीच्या आतील बाजूस खड्डे पडलेले असल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सदर केलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी नाली नादुरुस्त असून कडा तुटलेल्या आहेत तसेच नालीच्या आतील बाजूस खड्डे पडून घाण पाणी इतरत्र पसरत असून रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर नालीचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालात नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता एकता नगर येथील श्री अशोकराव सुरडकर यांच्या घरा पासून ते देवी मंदिरा पर्यंत नालीचे बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र ३ :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या परिसरात मार्बल, कोटा किंवा शहाबाद फरशी बसविण्याबाबत**



Scanned by Scanner Go

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या परिसरात मार्बल, कोटा किंवा शहाबाद फरशी बसविण्याबाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते कि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या परिसरात पेव्हर ब्लॉक खाली वर होऊन फुटल्या कारणाने पावसाचे पाणी साचत असून पुतळ्या वरील झाडावर बसलेल्या पक्षांच्या विष्ठेने साचलेले पाणी घाण होऊन दुर्गंध पसरत असल्या कारणाने सदर ठिकाणी मार्बल वा कोटा अथवा शहाबाद फारशी बसविण्याबाबत चा अहवाल नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केला आहे. त्यामुळे सदर काम करणे आवश्यक असल्याचे मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्व बाबींचा विचार करता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या परिसरात मार्बल वा कोटा किंवा शहाबाद फरशी बसविणे अत्यंत आवश्यक असल्याने सदर काम न. प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र ४ :- चाळीस बिघा भागातील पाचपांडे दवाखान्यासमोरील रस्ता दुरुस्तीकरण करणेबाबत.**

चाळीस बिघा भागातील पाचपांडे दवाखान्यासमोरील रस्ता दुरुस्तीकरण करणेबाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, चाळीस बिघा भागातील पाचपांडे दवाखान्यासमोरील रस्त्यावर खड्डे पडलेले असून रहदारीस अडथळा होत असल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सदर केलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी रस्त्याची दुरवस्था असून ठीक ठिकाणी खड्डे असल्याने रहदारीस अडथळा होत असून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच याबाबत श्री अनिल गांधी माजी न.प. सदस्य यांची सुद्धा तोंडी तक्रार प्राप्त झाली आहे. त्यामुळे रस्त्याचे दुरुस्ती करण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालात नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता चाळीस बिघा भागातील पाचपांडे दवाखान्यासमोरील रस्ता दुरुस्तीकरण करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे



Scanned by Scanner Go

**विषय क्र ५ :- सनदी लेखापाल यांनी सन 2009 पर्यंत तयार केलेल्या दुहेरी लेखा नोंद पद्धती अहवालावर सभेची मान्यता घेणेबाबत.**

सनदी लेखापाल यांनी सन 2009 पर्यंत तयार केलेल्या दुहेरी लेखा नोंद पद्धती अहवालावर सभेची मान्यता घेणेबाबत लेखापाल लेखा विभाग न.प. मलकापूर यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, सनदी लेखापाल यांनी सन 2009 पर्यंत तयार केलेले वार्षिक लेखे हे दुहेरी लेखा नोंद पद्धतीने केले असल्याचे लेखापाल यांनी नमूद केले असून तसा अहवाल त्यांनी सादर केलेला आहे. त्यानुसार मलकापूरचे दुहेरी लेखा नोंद पद्धतीने (Double Entry System) वार्षिक लेखे (Financial Statement) हे सन 2009 पासून सन 2020 पर्यंत चे प्राप्त झाले आहेत. सदर लेखे हे दुहेरी नोंद पद्धतीने सनदी लेखापाल यांनी तयार केले आहेत तसेच सदर वार्षिक लेखे मध्ये Balance Sheet, Profit & Loss A/c, Cash Flow Statement व Receipt & Payment A/c तयार करून न. प. ला सादर केले आहेत. त्यामुळे सदर लेखे हे Accounting Standard व Accounting Policy नुसार तयार केले असल्याचे लेखापाल यांनी अहवालात नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता सनदी लेखापाल यांनी सन 2009 ते 2020 पर्यंत दुहेरी लेखा नोंद पद्धतीने तयार केलेल्या वार्षिक लेख्यांना ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. ६:- मै. विशाल दिगंबर चव्हाण सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर लाड कमेटी शिफारसी वारस हक्काने नियुक्ती मिळणेबाबत.**

मै. विशाल दिगंबर चव्हाण सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर लाड कमेटी शिफारसी वारस हक्काने त्यांच्या पत्नीस नियुक्ती मिळणेबाबत आरोग्य लिपीक, कार्यालय परीवेक्षक व उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या अहवालावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मै. विशाल दिगंबर चव्हाण सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर लाड कमेटी शिफारसी वारस हक्काने नियुक्ती करण्या संदर्भात आरोग्य लिपीक, कार्यालय परीवेक्षक व उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी नमूद केले असून तसा अहवाल त्यांनी सादर केलेला आहे.



Scanned by Scanner Go

त्यानुसार न.प. मलकापूरचे कर्मचारी मै. विशाल दिगंबर चव्हाण हे आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून कार्यरत होते परंतु त्यांचे दि. २८/०२/२०२२ रोजी सेवेत असतांना त्यांचे निधन झाले व त्यामुळे त्यांच्या मृत्यू नंतर झालेल्या रिक्त पदावर त्यांच्या पत्नी श्रीमती सोनू विशाल चव्हाण यांना शासन परीपात्रिका क्र लासशी २००६/59/प्रक्र ७७/०६/नवि ६, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ११/०८/२००६ नुसार लाड कमेटी शिफारस वारस हक्काने नियुक्ती मिळण्या बाबत आरोग्य लिपीक, कार्यालय परीवेक्षक व उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी अहवालात नमूद केले आसून त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता मै. विशाल दिगंबर चव्हाण सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर शासन परीपात्रिका क्र लासशी २००६/59/प्रक्र ७७/०६/नवि ६, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ११/०८/२००६ नुसार लाड कमेटी शिफारसी वारस हक्काने नियुक्ती साठी आवश्यक असलेले सर्व दस्त ऐवजांची पूर्तता केली असल्याने त्यांच्या पत्नी श्रीमती सोनू विशाल चव्हाण यांना नियुक्त करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र. ७:- न.प. हद्दीतील शिवाजी नगर भागातील स्मशान भूमीचे दुरुस्तीकरण करणे बाबत**

न.प. हद्दीतील शिवाजी नगर भागातील स्मशान भूमीचे दुरुस्तीकरण करणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, न.प. हद्दीतील शिवाजी नगर भागातील स्मशान भूमी मध्ये दुरुस्तीकरण गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सादर केलेला आहे. त्यानुसार शहरातील शिवाजी नगर भागातील स्मशान भूमीमध्ये शहरातील निम्या भागातील रहिवाशी दहनविधी व संबंधित सोपस्कार पार पाडतात व त्यासाठी स्मशानभूमी मध्ये आवश्यक त्या सुविधासुद्धा उपलब्ध आहेत. या स्मशानभूमी मध्ये किरकोळ दुरुस्ती जसे कि भिंतीला प्लास्टर तसेच अवश्यक ठिकाणी किरकोळ बांधकाम करणे जरुरीचे आहे जेणे करून सदर ठिकाणी नागरिकांना दहन विधीसाठी त्रास होऊ नये त्यामुळे सदर ठिकाणी दुरुस्ती करण करणे आवश्यक असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालात नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.



Scanned by Scanner Go

वरील सर्वबाबींचा विचार करता शिवाजी नगर भागातील स्मशान भूमी मध्ये दुरुस्तीकरण करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र. ८:- न.प. मलकापूर पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाचे दुरुस्तीकरण करणे बाबत.**

न.प. मलकापूर पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाचे दुरुस्तीकरण करणे बाबत पा.पु. अभियंता यांचे दि.२६/०९/२०२२ चे पत्रानुसार, नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, पाणी पुरवठा अभियंता यांचे दि. २६/०९/२०२२ चे पत्राला अनुसरून नगर अभियंता यांनी केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले कि न.प. मलकापूर पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाचे दुरुस्तीकरण करणे गरजेचे आहे व तसा अहवाल त्यांनी सादर केलेला आहे. त्यानुसार न.प. मलकापूर पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाचे दुरुस्तीकरणासाठी...

1)खिडक्यांच्या काचा बसविणे (5 नं.)

2)पा.पु. कार्यालय, ब्लोअर रूम, व हॉलच्या दरवाज्याच्या काचा बसविणे

3)रंगरंगोटी करणे.

आवश्यक असल्याचे नगर अभियंता यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता न.प. मलकापूर पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाचे दुरुस्तीकरण करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र. ९:- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबतच्या विषयाची मा. मुखाधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते कि, घनकचरा संकलनाचे कामाकरिता सन २०२२-२३ साठीचे अंदाजपत्रकास दि २९/०८/२०२२ रोजी तांत्रिक मंजुरात मिळाली असून सदर कामाचा खर्च १५ व्या



Scanned by Scanner Go

वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून प्रशासकीय मंजुरात घेणे, निवीदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देणे इ. कामांना किमान एक महिना वेळ लागणे अपेक्षित असून सदर काम सुरु ठेवणे, शहरात स्वच्छता ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नवीन निवीदा प्रकिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत अथवा जास्तीत जास्त एक महिना सदर कामास १५ व्या वित्त आयोग अंतर्गत मुदत वाढ देणे आवश्यक आहे करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घावी लागेल. त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे आरोग्य निरीक्षक, न.प. मलकापूर यांनी अहवालाद्वारे सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करिता आरोग्य निरीक्षक यांनी अहवालात नमूद केल्यानुसार सदर कामास सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तींना अधीन राहून दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. १०:- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबतच्या विषयाची मा. मुखाधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते कि, घनकचरा प्रक्रियेचे कामाकरिता सन २०२२-२३ साठीचे अंदाजपत्रकास दि २९/०८/२०२२ रोजी तांत्रिक मंजुरात मिळाली असून सदर कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून प्रशासकीय मंजुरात घेणे, निवीदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देणे इ. कामांना किमान एक महिना वेळ लागणे अपेक्षित असून सदर काम सुरु ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नवीन निवीदा प्रकिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत अथवा जास्तीत जास्त एक महिना सदर कामास १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत मुदत वाढ देणे



Scanned by Scanner Go

आवश्यक आहे करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घावी लागेल. त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे आरोग्य निरीक्षक, न.प. मलकापूर यांनी अहवालाद्वारे सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करिता आरोग्य निरीक्षक यांनी अहवालात नमूद केल्यानुसार सदर कामास सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तींना अधीन राहून दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. ११:- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबतच्या विषयाची मा. मुखाधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते कि, घनकचरा संकलनाचे कामाकरिता सन २०२२-२३ साठीचे अंदाजपत्रकास दि २९/०८/२०२२ रोजी तांत्रिक मंजुरात मिळाली असून सदर कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून प्रशासकीय मंजुरात घेणेकरिता या कार्यालयाचे पत्र क्र मनप/३६०९/२०२२ दि. ०२/०९/२०२२ नुसार प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सदर केलेला आहे, परंतु अद्याप सदर प्रशासकीय मंजुरात प्राप्त झालेली नाही, तरी सदर प्रशासकीय मंजुरात प्राप्त होणे व त्यानंतर निवीदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देणे इ. कामांना किमान एक महिना वेळ लागणे अपेक्षित असून सदर काम सुरु ठेवणे, शहरात स्वच्छता ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नवीन निवीदा प्रकिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत अथवा जास्तीत जास्त एक महिना सदर कामास १५ व्या वित्त आयोग अंतर्गत मुदत वाढ देणे आवश्यक आहे करिता



Scanned by Scanner Go

सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घावी लागेल. त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे आरोग्य निरीक्षक, न.प. मलकापूर यांनी अहवालाद्वारे सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करिता आरोग्य निरीक्षक यांनी अहवालात नमूद केल्यानुसार सदर कामास सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. १२:- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबतच्या विषयाची मा. मुखाधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते कि, घनकचरा प्रक्रियेचे कामाकरिता सन २०२२-२३ साठीचे अंदाजपत्रकास दि २९/०८/२०२२ रोजी तांत्रिक मंजुरात मिळाली असून सदर कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून प्रशासकीय मंजुरात घेणेकरिता या कार्यालयाचे पत्र क्र मनप/३६०९/२०२२ दि. ०२/०९/२०२२ नुसार प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सदर केलेला आहे, परंतु अद्याप सदर प्रशासकीय मंजुरात प्राप्त झालेली नाही, तरी सदर प्रशासकीय मंजुरात प्राप्त होणे व त्यानंतर निवीदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देणे इ. कामांना किमान एक महिना वेळ लागणे अपेक्षित असून सदर काम सुरु ठेवणे, शहरात स्वच्छता ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नवीन निवीदा प्रकिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत अथवा जास्तीत जास्त एक महिना सदर कामास १५ व्या वित्त आयोग अंतर्गत मुदत वाढ देणे आवश्यक आहे करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोगाच्या



Scanned by Scanner Go

निधीतून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घावी लागेल. त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तींना अधीन राहून दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे आरोग्य निरीक्षक, न.प. मलकापूर यांनी अहवालाद्वारे सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करिता आरोग्य निरीक्षक यांनी अहवालात नमूद केल्यानुसार सदर कामास सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तींना अधीन राहून दिनांक १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

आर यु सुरडकर
प्रशासक
नगरपरिषद मलकापूर



Scanned by Scanner Go